


सत्यमेव जयते

**अण्णाभाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था (आर्टी), मुंबई**

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)

बी-२०१/२०२ अर्जुन सेंटर, स्टेशन रोड, गोवंडी (पु) मुंबई- ४०० ०८८

समता न्याय एकात्मता

रजि नं.४३७६०३ Email Id- esta.arti@gmail.com website https://arti.org.in फोन नं. ०२२ - ४४५१५८५४/२५५००१९४/२५५००१९५


# आर्टी, मार्फत महाराष्ट्र राज्यातील मातंग व तत्सम जातीच्या उमेदवारांकरीता महाराष्ट्र लोकसेवाआयोग वनसेवा मुख्य परीक्षा २०२४ उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना मुलाखतीकरीता आर्थिक सहाय्य योजना

आर्टी, मार्फत महाराष्ट्र राज्यातील मातंग व तत्सम जातीचे जे उमेदवार महाराष्ट्र लोकसेवा आयोग वनसेवा मुख्य परीक्षा २०२४ उत्तीर्ण झाले आहेत अशा **उमेदवारांना मुलाखतीकरीता एकरकमी आर्थिक सहाय्य प्रदान** करण्यात येणार आहे.

योजनेचे स्वरूप-

- पात्र मातंग व तत्सम जातीच्या उमेदवारांना एकरकमी रक्कम रु १०,०००/- आर्थिक सहाय्य आर्टी मार्फत दिले जाईल.
- **पात्रता:-** 1 उमेदवार महाराष्ट्र राज्यातील व मातंग व तत्सम जातीचा असावा

  2 . उमेदवार दि. २९/१०/२०२५ रोजी जाहीर झालेल्या ०५३/२०२५ च्या महाराष्ट्र लोकसेवा आयोग महाराष्ट्र वनसेवा मुख्य परीक्षा उत्तीर्ण असावा.

  3. सदर योजनेसाठी वयोमर्यादा ३५ वर्ष राहील.

अर्ज करण्यासाठी:-

1. उमेदवाराने खाली दिलेल्या लिंकवर (गुगल फॉर्म) जाऊन दि. १३/१२/२०२५ रोजी संध्या ५:०० वाजेपर्यंत ऑनलाईन अर्ज भरावा. (ऑनलाईन अर्ज भरणे बंधनकारक आहे.)

**अर्ज भरण्यासाठीची लिंक**- https://forms.gle/P७Ge६AoJ१h९p२RBQA

2. संपूर्ण अर्ज व्यवस्थित व अचूक भरल्याची खात्री केल्यानंतरच उमेदवाराने अर्ज सबमिट करावा.
3. अपूर्ण माहिती भरल्यास अथवा माहिती लपवल्यास, कोणत्याही टप्प्यावर सदर विद्यार्थाची उमेदवारी आर्टी, मुंबई मार्फत रद्द करण्यात येईल व आर्थिक सहाय्य ची संपूर्ण रक्कम वसूल करण्यात येईल.
4. एकाच विद्यार्थ्याने वेगवेगळी माहिती भरून एकापेक्षा जास्त वेळा अर्ज भरल्यास विद्यार्थ्यांची उमेदवारी आर्टी, मुंबई मार्फत रद्द करण्यात येईल
5. ऑनलाईन अर्जाव्यतिरिक्त उमेदवाराने सदर जाहिरातीसोबत जोडलेला अर्ज अचूक भरून अर्जासोबत खाली नमूद केलेल्या कागदपत्रांची स्व-साक्षांकित छायांकीत एक प्रत (हार्ड कॉपी) आर्टी, मुंबई कार्यालयास पोस्ट/कुरियर द्वारे दि.15/12/2025 रोजी संध्या 5:00 वाजेपर्यंत पाठवावी

**(कागदपत्राच्या पाकीटावर 'एम.पी.एस.सी वनसेवा 2025 मुलाखतीसाठी आर्थिक सहाय्य' असे नमूद करावे.)**

1. जातीचा दाखला/जात वैधता प्रमाणपत्र (कोणतेही एक)
2. रहिवास दाखला (डोमासाईल प्रमाणपत्र)
3. एम.पी.एस.सी- वनसेवा मुख्य परीक्षा-2024 चे प्रवेश पत्र
4. आधार कार्ड
5. कोणत्याही राष्ट्रीयकृत बैंक पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकीत प्रत (बैंक खाते फक्त अर्जदाराच्या नावानेच असावे. पालक/नातेवाईक/मित्र यांच्या बैंक खात्याचा तपशील दिल्यास अर्जदाराची उमेदवारी रद्द करण्यात येईल.)

**सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी दोन्ही स्वरुपात (ऑनलाईन व ऑफलाईन) अर्ज करणे बंधनकारक आहे. केवळ ऑनलाईन अर्ज किंवा फक्त हार्ड कॉपी जमा केल्यास अर्ज ग्राह्य धरला जाणार नाही.**

**अर्ज पाठविण्यासाठीचा पत्ता: अण्णा भाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था, (आर्टी) अर्जुन सेंटर बी विंग २०१/२०२ गोवंडी मुंबई- ४०० ०८८ अधिक माहितीसाठी ०२२-४४५१५८५४/२५००१९४/१९५ येथे संपर्क करावा.**